# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ फॅक्स (०२१३३) २३०५८२

ईमेल : gcoeara@gmail.com वेबसाईट : www.gcoeara.ac.in


जा.क्र. शाअवसंमअ / संगणक /२०१६/ 32

दिनांक : ०४ जानेवारी २०१६

## परिपत्रक

सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, संस्थेचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले आहे. संस्थेचे संकेतस्थळ आपण **http://www.gcoeara.ac.in/** या पत्त्यावर पाहू शकता. महाविद्यालयाची सुयोग्य प्रतिमा जगासमोर येण्यासाठी संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. विभागीय माहिती व विभागीय स्तरावर पार पडणाऱ्या सर्व कार्यक्रमांची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची असेल.

२. अनिवार्य प्रगटीकरण (Mandatory disclosure), नागरिकांची सनद (citizens charter) , जन माहिती अधिकारी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ४ (१)(ख) नुसार १७ मुद्द्यांची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी प्रबंधकांची असेल.

३. महाविद्यालयीन नियतकालिकाची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी Magazine Incharge यांची असेल.

४. Training & Placement, Alumni Association ई. ची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी Training & Placement Officer यांची असेल.

५. जिमखाना विभागामार्फत पार पडणाऱ्या कार्यक्रमांची माहिती जिमखाना अधिकारी देतील.

६. संस्था स्तरावर होणाऱ्या सर्व कार्यक्रमांची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी संबंधित कार्यक्रमाच्या समन्वयकाची असेल.

७. ग्रंथालयाची अद्ययावत माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी ग्रंथालय प्रमुख यांची असेल.

८. निविदा सूचनांची माहिती वेळोवेळी देण्याची जबाबदारी भांडारपाल यांची असेल.

संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची माहिती प्राचार्यांमार्फत श्री . डी. जे. परेरा (सहाय्यक प्राध्यापक) संगणक विभाग यांना Soft Copy व Hard Copy मध्ये सादर करावी. तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर संबंधित कार्यक्रमाचे फोटो द्यावयाचे असल्यास फोटोंना नाव देऊन फोटोंच्या soft copies सादर कराव्यात.

( प्रा. एस. व्ही. जोशी )
प्र. प्राचार्य
शा. अ. व. सं. महाविद्यालय
अवसरी (खुर्द)

प्रत :१) विभागप्रमुख - संगणक / यंत्र / स्वयंचल / अणुविद्युत / उपकरणीकरण / स्थापत्य / ग्रंथालय / उपयोजित विज्ञान / कार्यालय/ कर्मशाळा – त्यांनी हे परिपत्रक संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२) भांडारपाल यांना आवश्यक कार्यवाहीसाठी